**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक २७/२०१८** **दिनांक ०३/०४/२०१८** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ९४२२०६५३४४ |


| **मागील हवामान सारांश दि. ३०/०३/२०१८ ते ०३/०४/२०१८** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (०४/०८/२०१८ सकाळी ८:३० पासून ०८/०४/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **०४/०४** | **०५/०४** | **०६/०४** | **०७/०४** | **०८/०४** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ४ | १ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३८ | ३८ | ३७ | ३७ | ३९ |
| किमान तापमान (अं.से) | : | २३ | २४ | २४ | २४ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ३ | ३ | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६९ | ७१ | ६८ | ६३ | ५८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | १६ | १५ | १९ | २० | १७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००२ | ०० | ००२ | ००३ | ००२ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक ६ ते ८ एप्रिल, २०१८ रोजी पावसाची शक्यता आहे. दिनांक ४ ते ८ एप्रिल २०१८ पर्यंत अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक ४ ते ८ एप्रिल, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग २ ते ३ किमी प्रति तास राहिल. आहे.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कडधान्य पिके** | **काढणी** | • तयार झालेल्या कडधान्य पिकांची सकाळी आणि संध्याकाळी काढणी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. वाळलेली पिकांची संरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने काढावीत.<br>• वाढते तापमान व सापेक्ष आर्दतेत होणाऱ्या बदलामुळे पाण्याच्या उपलब्धतेनुसार चिकू बागेमध्ये पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. |
| **नारळ/ सुपारी** | —— | • सरासरी तापमानात वाढ झाल्यामुळे नारळाच्या बागेला ५ ते ६ दिवसांनी आणि सुपारी बागेला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी दयावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला लागवड** | **फळधारणा** | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी प्रति हेक्टर ४ रक्षक सापळे लावावेत. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | — | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडुपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे उष्णतेपासून योग्यते संरक्षण करावे. गोठयामध्ये व शेडमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे.<br>• दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. |
| **सुचना** | — | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |